नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
तळमजला , नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर पुणे -४११ ००१
फोन-०२०-२६१२३८२६ e-mail desk९est@gmail.com

---

क्र-का-९/आस्था-७/विधी पदवीधर/करार नियुक्ती/जाहिरात/72/२०२५ दिनांक- 06/०२/ २०२५

प्रति,

सहायक संचालक (जाहिरात),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
तळमजला, मंत्रालय, मुंबई -३२.

विषय :- जाहिरात प्रसिध्द करणेबाबत..

नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयातील अपिल व न्यायालयीन कामकाजाकरीता मदतनीस या पदाकरिता करार पद्धतीने नियुक्ती करण्याकरिता ०२ पदे तात्पुरत्या स्वरुपात भरावयाची आहेत. त्याबाबत वृत्तपत्रात प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीचा नमुना सोबत जोडलेला असून, सदरहू जाहिरात राज्य स्तरावरील सर्वाधिक खपाच्या एका मराठी वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात यावी. सदरहू जाहिरात संबंधित जिल्हयाच्या वृत्तपत्रातील पुरवणीमध्ये प्रसिध्द करु नये. जाहिरातीचे देयक या कार्यालयास सादर करावे. सदर जाहिरात संबंधित वृत्तपत्रात प्रसिध्दीसाठी सोबत चार प्रतीत पाठवीत आहे. तरी सदरची जाहिरात त्वरीत प्रसिध्द करावी.

प्रसिध्दीकरणाबाबतच्या सूचना पुढीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | जाहिरात देणाऱ्या कार्यालयाचे नांव व दूरध्वनी क्रमांक | नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,<br>महाराष्ट्र राज्य,पुणे - ४११ ००१<br>दूरध्वनी क्र.०२० - २६१२४०१२, २६१२३८२६<br>ईमेल आयडी igr@igrmaharashtra.gov.in<br>desk९est@gmail.com |
| २. | प्रसिध्दीचा स्तर | राज्यस्तरीय सर्वाधिक खपाचे मराठी वृत्तपत्र |
| ३. | जाहिरात कोणत्या तारखेस प्रसिध्द करावयाची आहे. | तात्काळ दि. ०७.०२.२०२५ |
| ४. | जाहिरात प्रसिध्दीचे देयक कोणत्या अधिकाऱ्याकडे तयार करुन पाठवावयाचे आहे. | नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक<br>महाराष्ट्र राज्य,पुणे कार्यालय |

Scanned with OKEN Scanner

प्रस्तुतची जाहिरात कोणत्या दिनांकास व कोणत्या वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे, याची संबंधित वृत्तपत्राच्या प्रतीसह माहिती या कार्यालयास पुरविण्यात यावी, म्हणजे देयक अदा करण्याच्यादृष्टीने पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल.

Raut
**रविंद्र बिनवडे** (भा.प्र.से.)
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**
6/2/2025

प्रत :-

१) मा. अपर मुख्य सचिव, महसूल, द्रांक शुल्क व नोंदणी , मंत्रालय३२-मुंबई , यांना माहितीस्तव सविनय सादर.

२) नोंदणी उपमहानिरीक्षक (संगणक), नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
२/-प्रस्तुतची जाहिरात आपल्या विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

३) उपसंचालक (लेखा), नोंदणी महानिरिक्षक कार्यालय, पुणे यांना माहितीसाठी.

Scanned with OKEN Scanner

**नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य ,पुणे यांचे कार्यालय, तळमजला, नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर, पुणे § ४११००१.**

**दूरध्वनी क्र.०२०-२६१२३८२६**

**********************************************************************

## जाहिरात

नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयात, अपिल व न्यायालयीन कामकाजाकरीता मदतनीस या पदाकरिता करार पद्धतीने नियुक्ती करण्याकरिता इच्छुक विधी पदवीधर यांचेकडून दिनांक १३/०२/२०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहेत. त्याबाबतची सविस्तर माहिती नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

जा.क्र./का-९/आस्था-७/71 /२०२५ दि.06/०२/२०२५

Ravi
**रविंद्र बिनवडे (भा.प्र.से.)**
**नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य ,पुणे**
6/2/2025

Scanned with OKEN Scanner

महाराष्ट्र शासन

**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**
**तळमजला , नविन प्रशासकीय इमारत,विधान भवन समो,र पुणे -४११ ००१**
**फोन-०२०-२६१२३८२६ e-mail-do९.igro@igrmaharashtra.gov.in; desk९est@gmail.com**

---

क्र-का-९/आस्था-७/विधी पदवीधर/करार नियुक्ती/जाहिरात/ 71 /२०२५ दिनांक- 06 /०२/ २०२५

**जाहिरात**

नोंदणी महानिरिक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयात करार पध्दतीने अपिल व न्यायालयीन कामकाजाकरीता मदतनीस या पदावर नेमणूक करावयाची आहे. त्याकरिता पात्र विधी पदवीधर उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

करार पध्दतीने भरावयाची पदे, त्यांची अर्हता, संख्या, याची माहिती खालीलप्रमाणे.

**तक्ता - अ**

| अ.क्र. | पदनाम | संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १. | अपिल व न्यायालयीन कामकाजाकरीता मदतनीस | ०२ | विधी पदवी धारण केलेले उमेदवार |

**तक्ता - ब**
**कंत्राटी तत्वावर नेमण्यात येणाऱ्या उमेदवारांचे कामाचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील.**

| अ.क्र. | पदनाम | विवक्षित कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | अपिल व न्यायालयीन कामकाजाकरीता मदतनीस | महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम व नोंदणी अधिनियम मधील तरतुदीचा योग्य स्पष्टीकरण, अपील प्रकरणे आणि पुनरिक्षण प्रकरणांच्या संदर्भात मसुदा तयार करण्यास मदत करणे, रिट याचिकेत परिच्छेदानुसार उत्तर तयार करणेस मदत करणे त्याचबरोबर प्रतिज्ञापत्र-इन- उत्तर तयार करण्यासाठी मदत करणे इतर कार्यासनास न्यायालयीन प्रक्रियेबाबत प्रतिज्ञापत्र तयार करणेस मदत करणे वगैरे कामकाज करणे |

**अ) सर्वसाधारण सूचना**

१) उपरोक्त पदासाठी सोबत जोडलेल्या नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्ज सादर करण्याचा कालावधी जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून दि. १३ /०२/२०२५ रोजी सायंकाळी ६.००पर्यंत आहे.

२) मुदतीत अर्ज करणाऱ्या उमेदवारांची दि. १४/०२/२०२५ रोजी नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय तळमजला, नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर पुणे- ०१येथे सकाळी ११.०० वाजता मुलाखत घेण्यात येईल. काही कारणास्तव मुलाखतीच्या वेळेत बदल झाल्यास तो

Scanned with OKEN Scanner

अर्जदारास त्यांचे ई-मेलवर / भ्रमणध्वनीवर कळविण्यात येईल त्यासाठी कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

३) मुलाखतीस उपस्थित रहाण्याबाबत उमेदवारांना स्वतंत्ररित्या कळविण्यात येणार नाही.
४) मुलाखतीसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल.
५) मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास निवडीसाठी विचार केला जाणार नाही.
६) उमेदवारांच्या मुलाखती घेऊन तसेच शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर उमेदवारांना नियुक्ती आदेश देण्यात येतील.
७) करार पध्दतीने नियुक्ती देताना **०२ महिनेसाठी** नियुक्ती देण्यात येईल. कामकाज व आवश्यकता विचारात घेऊन आवश्यकतेनुसार नियुक्तीचे नूतनीकरण करण्यात येईल.
८) सदर उमेदवारांचे पारिश्रमिक Minimum wages Act प्रमाणे देण्यात येईल व त्याबाबत नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक ,महाराष्ट्र राज्य पुणे या कार्यालयाचा निर्णय अंतिम राहील.
९) निवड झालेल्या उमेदवारांना विहित केलेल्या नमुन्यात हमीपत्र द्यावे लागेल.
१०) अपूर्ण अर्ज, स्वाक्षरी, फोटो नसलेले अर्ज अपात्र करण्यात येतील.

**ब) अर्ज करण्याची पध्दत:-**

उमेदवाराने सोबतच्या अर्जाच्या नमुन्यात स्वत:चे संपूर्ण नांव ( आडनाव प्रथम), जन्म दिनांक, वय, लिंग (स्त्री / पुरुष), पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसहीत) व मोबाईल क्रमांक , ई-मेल आयडी याबाबतचा तपशिल नमुद करुन मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे तळमजला, नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर पुणे -४११ ००१ यांचे नावे अर्ज दि.१३/०२/२०२५ रोजी पर्यत शासकीय कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत समक्ष सादर करावा. या अर्जाचा नमुना नोंदणी व मुद्रांक विभागाची वेबसाईट www.igrmaharashtra.gov.in वर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

**अर्जासोबत खालील प्रमाणपत्रे स्वसांक्षाकित करुन जोडावीत.**

१) शैक्षणिक अर्हता धारण व इतर परिक्षा उत्तीर्ण असल्याबाबतच्या छायांकित प्रती.
२) अर्जावर पासपोर्ट आकाराचा फोटो साक्षांकित करुन चिकटवावा.
३) आधार व पॅनकार्ड प्रत.

**मुलाखत :-**

१) अर्ज सादर करणाऱ्या उमेदवारांनी दि.१४.०२.२०२५ रोजी मुलाखतीस प्रत्यक्ष हजर रहावे.
२) **मुलाखतीचे ठिकाण** :- नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, तळमजला, नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन समोर पुणे- ४११००१
३) **मुलाखतीची वेळ** :- सकाळी ११.०० वाजता
४) मुलाखतीचे वेळी कागदपत्रांच्या मूळ प्रती व छायांकित प्रती सोबत आणाव्यात. मुलाखतीसाठी प्रवास खर्च दिला जाणार नाही.

**क) सर्वसाधारण अटी व शर्ती.**

१. तक्ता -अ येथे नमूद पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो.
2. तक्ता -ब येथे नमुद करण्यात आलेले पदाचे कामकाज करण्यास उमेदवार सक्षम असणे आवश्यक आहे.
3. न्यायालयीन कामकाजाचे, नोंदणी अधिनियम १९०८ व महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम १९५८ चा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.
4. उमेदवार यांनी पोलीस विभागाचे चारित्र्य प्रमाणपत्र सादर करावे.

Scanned with OKEN Scanner

5. उमेदवार शारीरिक ,मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा.
6. नियुक्त करावयाची उमेदवार इतर व्यावसायिक कामात गुंतलेला नसावा.
7. सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. त्यांच्या कामकाजाबाबत सक्षम प्राधिकारी वेळोवेळी आढावा घेऊन कामाचे मूल्यमापन करतील.
8. नियुक्त केलेल्या उमेदवारांस नियमित सेवेत घेण्याची अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करता येणार नाही.
9. नियुक्ती प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा उमेदवारांच्या सेवा समाप्त करण्याचा अधिकार राहील.
10. अशा उमेदवारांना वाहन अनुज्ञेय / उपलब्ध असणार नाही .
11. अशा करार पध्दतीवरील उमेदवार यांनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे बंधनकारक राहील.
12. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेले उमेदवार नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नियंत्रणाखाली कार्यरत असतील.
13. करार पध्दतीने घेण्यात आलेल्या उमेदवार यांना सोपविण्यात येणाऱ्या कामाचे स्वरूप नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अंतिम निर्णयाने ठरेल.
14. करार पध्दतीने घेण्यात येणाऱ्या उमेदवारांची बैठक व्यवस्था उपलबध असलेल्या जागेनुसार करण्यात येईल.

पदांची संख्या निवड प्रक्रियेबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहेत.

दिनांक :- /०२ /२०२५

Raut

रविंद्र बिनवडे (भा.प्र.से.)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे
6/2/2025

Scanned with OKEN Scanner

## अर्जाचा नमुना

करार पद्धतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज.

| |
|---|
| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे स्वसाक्षांकित छायाचित्र येथे चिकटवावे. |

अर्जदाराचा स्वसाक्षांकित फोटो

प्रति,

मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे
तळमजला, नविन प्रशासकीय इमारत,
विधान भवन समोर पुणे -४११ ००१

**विषय:-** अपिल व न्यायालयीन कामकाजाकरीता मदतनीस या पदाकरिता करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.

**संदर्भ:-** आपली जाहिरात क्र. ______________ दिनांक _______________

महोदय,

मी आपल्या कार्यालयात अपिल व न्यायालयीन कामकाजाकरीता मदतनीस या पदाकरिता करार पध्दतीने काम करू इच्छितो/इच्छिते.

१. पूर्ण नाव (प्रथम आडनाव) :-

२. पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता (मोबाईल नंबर व ई-मेल) :-

३. जन्म दिनांक :-

४. वय :-

५. स्त्री/पुरुष :-

६. अर्जदाराची शैक्षणिक अर्हता :-

Scanned with OKEN Scanner

वरील माहितीच्या पुराव्यादाखल मी खालील साक्षांकित कागदपत्रे सोबत सादर करीत आहे. मूळ कागदपत्रे मुलाखतीच्या वेळी सादर करीन.

१. शैक्षणिक अर्हते बाबतची प्रमाणपत्रे
२. आधारकार्ड व पॅनकार्ड
३. अनुभव प्रमाणपत्र

मी प्रतिज्ञा पूर्वक नमूद करतो की, वरील सर्व माहिती सत्य आहे. ही माहिती चुकीची आढळून आल्यास होणाऱ्या कारवाईस मी स्वत: जबाबदार राहीन, याची मला जाणीव आहे. विवक्षित प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी करार पध्दतीने जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाणः- अर्जदाराची सही व नाव

दिनांकः-

सोबत :- १)
२)
३)

Scanned with OKEN Scanner